
● बंगालच्या लोकसंगीताचे पडसाद हेमंतकुमार यांच्या संगीतामधून नेहमीच उमटतात. परंतु काळाबरोबर पुढे जाताना *पुलिस*मध्ये त्यांनी एक वेगळा प्रयत्न केला ● गायकाचे एकच गाणे असलेला *सहारा* ● *दो फूल*चे सगळे क्रेडिट वसंत देसाई आणि हसरत जयपुरी यांचे


□ इसाक मुजावर

***पुलिस*(१९५८):**

पार्श्वगायन करीत असतानाच एक यशस्वी संगीतकार म्हणून देखील हेमंतकुमारनी आपली वाटचाल १९५८साली यशस्वीपणे पुढे चालू ठेवली होती. बंगालचे लोकसंगीत हा त्यांच्या संगीताचा खरा बेस होता. तरीही चित्रपट संगीताचा बदलता रंग पाहून पाश्चिमात्य संगीताचा स्पर्शदेखील हळूहळू त्यांच्या संगीताला होऊ लागला. १९५७च्या *एक झलक* या चित्रपटातील 'आजा जरा मेरे दिल के सहारे' हे पाश्चिमात्य संगीताचा स्पर्श झालेले त्यांच्या संगीतातील पहिले गाणे. अभिनेता प्रदीपकुमार या चित्रपटाचा नायक व निर्माता होता आणि त्यांच्या या चित्रपटात गीता दत्तच्या आवाजात हेमंतकुमार यांच्या संगीतातील पाश्चिमात्य संगीताचा पहिला सूर फुलला होता. प्रदीपकुमारने *एक झलक* नंतर निर्माण केलेला *पुलिस* हा दुसरा चित्रपट. या चित्रपटात हेमंतकुमारनी पाश्चिमात्य संगीताचा सूर पुन्हा पकडला. या चित्रपटातील 'मिन, मिन, चिक चिक, मेरे तुम हो फिर क्या है' व 'ओ, ओ, ओ, बेबी हूं हूं,' या दोन गाण्यात. गीता दत्तबरोबर ही दोन्ही गाणी हेमंतकुमारनीच या चित्रपटात गायली होती आणि ती प्रदीपकुमार आणि त्याची नायिका मधुबाला या दोघांवर चित्रित करण्यात आली. *नागीन*मध्ये हेमंतमकुमार यांच्या संगीतातील बीनच्या तालावर नाचताना 'नाचता येईना आंगन वाकडे' अशी प्रदीपकुमारची अवस्था झाली होती. तरीही *पुलिस*मधील 'ओ ओ ओ बेबी'चा सूर पकडून त्याने नाचण्याचा केवीलवाणा प्रयत्न केला होता.



हेमंतकुमार



प्रदीपकुमार

या चित्रपटात एकूण सात गाणी होती. आणि त्यापैकी सहा गाणी हेमंतकुमार व गीता दत्त यांच्या आवाजात होती. 'मीन, मिन, चिक, चिक,' व 'ओ ओ ओ बेबी' शिवाय या चित्रपटातील 'यह कौन आया इस दिल के बसेरे में', 'चले हम कहाँ कहो चले हम कहाँ', 'दिल पर यह तूने कैसे खंजर मारा रे', 'छूप जा हमारे दिल में' या आणखी चार गाण्यात त्या दोघांचा आवाज होता. या साऱ्या गाण्यांचा बाज उडत्या गाण्यांचा होता.

रफीने या चित्रपटातील एकच गाणे कोरसबरोबर गायले होते. या गाण्याचे बोल होते 'हाय, हाय, दिल को लगेला मुहब्बत चस्का' हे गाणे हास्य अभिनेते धुमाळ यांच्यावर चित्रीत करण्यात आले होते. या चित्रपटातील गाण्यांवर क्लब संगीताचा प्रभाव होता. क्लब संगीतात जी मादकता हवी असते ती पकडूनच हेमंतकुमारनी या चित्रपटावर संगीताचा साज चढवला होता. *आरपार*मधील ओ. पी. नय्यर यांच्या संगीतातील क्लब गाणी लिहिणाऱ्या मजरूहनीच या चित्रपटातील एकजात सारी गाणी लिहिली होती.

***सहारा*(१९५८):**

१९५८च्या *पुलिस*मध्ये हेमंतकुमार यांच्या संगीतात क्लब संगीताचा रंग होता, तर *पुलिस*बरोबरच १९५८ साली पडद्यावर आलेल्या *सहारा*च्या त्यांच्या संगीतात स्त्री वेदनेतील एक आर्तता. मीनाकुमारी या चित्रपटाची एक नायिका होती. जिच्यावर एका पाठोपाठ एक दुःखाचे डोंगर कोसळत आहेत, अशा अगतिक नायिकेच्या भूमिकेमुळे तिच्या भूमिका तेव्हा नेहमी शोकांत असायच्या. यामुळे हेमंतकुमारनी *सहारा*च्या संगीतात तिच्या या शोकांत भूमिकेचाच सूर पकडला होता आणि तो या चित्रपटातील 'बनके सुहागन रही अभागन, रूठ गई तकदीर मेरी', 'अंधोपे दया करना दाता', 'सो जा दुखियारे, दुखिया के प्यारे' या तीन गाण्यातून चांगलाच जाणवत होता.

*पुलिस*मधील हेमंतकुमार यांच्या संगीतात एकाही गाण्यात लताबाईंचा आवाज नव्हता. पण *सहारा*मधील नायिकेची भूमिका शोकांत असल्यामुळे या चित्रपटातील संगीतात लताबाईंच्या आवाजाला पर्याय नव्हता. यामुळे या चित्रपटातील नऊ गाण्यांपैकी सहा गाण्यात हेमंतकुमारनी लताबाईंचा आवाज घेतला होता. 'बनके सुहागन रही अभागन', 'सो जा दुखियारे', 'अंधी पे दया करना दाता' या तीन गाण्यांबरोबर लताबाईंनी या चित्रपटातील 'रूत आए रूत जाए, दुनिया रंग बदलती जाए' व 'छम छम छम छम करती चले वो माँ, दुनियासे न डरे वो माँ' ही आणखी दोन गाणी एकटीने गायली होती; तर 'अटकन मटकन बिल्ली बजाए बाजा' हे लहान मुलांचे गाणे आरती मुखर्जीबरोबर. हे गाणे मीनाकुमारी व बालतारका डेझी ईराणी यांच्यावर चित्रीत करण्यात आले होते.

*पुलिस*मधील हेमंतकुमार यांच्या संगीतात गायकाचा आवाज नाही, असे एकही गाणे नव्हते. पण *सहारा*मध्ये मात्र त्यांच्या संगीतात गायकाचा आवाज एकाच गाण्यापुरता

मर्यादित होता आणि हा आवाज हेमंतकुमार यांचा स्वतःचाच होता. या चित्रपटातील 'हर दुखडा सहनेवाली, मुंह से न कुछ कहनेवाली' हे गाणे त्यांनी गायले होते. पण ते त्यांच्या एकट्याच्या आवाजात नव्हते. या गाण्यात त्यांच्याबरोबर त्यांची गायिका पत्नी बेला मुखर्जी हिचा आवाजदेखील होता. १९५७च्या *फॅशन* या चित्रपटात हेमंतकुमारनी त्यांच्या पत्नीबरोबर 'बडे बडे तुफानो के मादी को लजा ना ना' हे गाणे गायले होते. हे गाणे भिकाऱ्याचे एक गाणे होते. *सहारात* त्या दोघांनी मिळून गायलेले गाणेदेखील भिकाऱ्याचेच एक गाणे होते.

सहा गाण्यात लताबाईंचा आवाज घेत असताना हेमंतकुमारनी 'मुझे तरके तालुक के लिए समझाया जाता है' या एका गाण्यात सुधा मल्होत्राचा आवाज घेतला होता. तर 'महफिल मे तेरे हुस्न के दीवाने बहुत है' या गाण्यात प्रतिमा बॅनर्जींचा.


वसंत देसाई


हसरत जयपुरी

दो फूल(१९५८):

हेमंतकुमारनी १९५८ साली *पुलिस* व *सहारा* या दोन चित्रपटानाच संगीत दिले. त्यांच्याप्रमाणेच वसंत देसाईनीदेखील १९५८ साली फक्त दोनच चित्रपटांना संगीत दिले. *दो फूल* आणि *मौसी*. या पैकी *दो फूल* हा चित्रपट ए. आर. कारदार यांचा होता. कारदार यांचा चित्रपट म्हटला की, त्यांच्या चित्रपटाला नौशाद यांचे संगीत असले पाहिजे ही गोष्ट ठरून गेल्यासारखी झाली होती. आणि १९४२च्या *नई दुनिया*पासून ते १९५०च्या *दास्तान*पर्यंत त्यांच्या चित्रपटात नौशाद यांच्याशिवाय अन्य कोणाही संगीतकाराचे संगीत कधी ऐकू आले नव्हते. १९५१च्या *नवजवान*मध्ये मात्र हे चित्र बदलले. हा चित्रपट कारदार यांचा असला तरी या चित्रपटात नौशाद यांच्याऐवजी एस. डी. बर्मन यांचे संगीत ऐकू आले. त्यानंतर *जादू* (१९५१), *दीवाना*(१९५२) या कारदार यांच्या दोन चित्रपटात नौशाद यांचे संगीत ऐकू आले. तरीही त्यानंतर कारदार यांचे चित्रपट नौशाद एके नौशादचा पाढा गिरवत राहिले नाहीत. एस. डी. बर्मन (*नवजवान, जीवनज्योती*), सी. रामचंद्र (*यास्मिन*), गुलाम महंमद (*दिले नादान*), रोशन (*बराती*), ओ. पी. नय्यर (*बाप रे बाप*) या संगीतकाराचे संगीत कारदार यांच्या चित्रपटात ऐकू आले. *दो फूल*मध्ये कारदार यांच्या चित्रपटातील संगीताचा सूर वसंत देसाईनी छेडला. हा चित्रपट लहान मुलांचा एक चित्रपट होता.

बुट पॉलिश या चित्रपटातील रतनकुमार व बेबी नाज यांच्या भूमिकांना मिळालेल्या लोकप्रियतेनंतर लहान मुलांच्या भूमिकांना प्राधान्य देणाऱ्या चित्रपटांची एक लाटच आपल्याकडे आली होती. या लाटेत *जागृति, अब दिल्ली दूर नही, तुफान और दिया, बापबेटी, फैरी, टुटे खिलौने, बंदीश, हम पंछी एक डाल के* यासारखे लहान मुलांच्या भूमिकांना प्राधान्य देणारे काही चित्रपट पडद्यावर आले होते. यापैकी *बापबेटी* या चित्रपटाचे वैशिष्ट्य हे होते की, या चित्रपटात गायकाच्या आवाजातील एकही गाणे नव्हते. एकजात सारी गाणी गायिकांच्या आवाजात होती. *दो फूल*मधील वसंत देसाई यांच्या संगीताचेदेखील हेच वैशिष्ट्य होते. लता, आशा व आरती मुखर्जी या तीन गायिकांनीच या चित्रपटातील सारी गाणी गायली होती.

लता व आशा या दोघींनी काही चित्रपटात एकत्र गाणी गायली. १९५१ च्या *दामन* या चित्रपटातील के. दत्ता तथा दत्ता कोरगावकर यांच्या संगीतातील 'ये रूकी रूकी हवाए' हे त्या दोघींनी एकत्र गायलेले पहिले गाणे. त्यानंतर १९५७ पर्यंत 'चन्नो के हाथ भरी मेहंदी' (*चांदनी चौक* १९५४), 'ये बरखा बहार, सौतनिया के द्वार' (*मयूर पंख* १९५४), 'मन भावन के घर जाए गोरी' (*चोरी चोरी* १९५६), 'कर गया रे कर गया मुझपे जादू' (*बसंत बहार* १९५६), 'अजी चले आवो तुम्हे आँखोने दिल में बुलाया' (*हलाकू* १९५६), 'ओ चांद जहाँ ओ जाए' (*शारदा* १९५७), 'सखी री सुन बोले पपीहा उस पार' (*मिस मेरी* १९५७) ही सात गाणी त्यांनी एकत्र गायली. या गाण्यांपैकी *चांदनी चौक*मधील गाण्यात त्या दोघींच्या बरोबर मीना मंगेशकर यांचा आवाज होता. बाकीची गाणी त्या दोघींच्या आवाजात होती. *चांदनी चौक*चे संगीतकार होते रोशन. *शारदा*चे सी. रामचंद्र. *मिस मेरी*चे हेमंतकुमार. बाकीच्या चार चित्रपटातील त्यांची गाणी शंकर-जयकिशन यांनी संगीतबद्ध केली होती आणि ती नृत्यगीतं होती हे त्यांच्या या गाण्याचे वैशिष्ट्य होते.

दामन ते *मिस मेरी*पर्यंत एकत्र गाणी गाताना लता व आशा या दोघींनी एका गाण्याची मर्यादा कधी ओलांडली नव्हती. पण *दो फूल*मध्ये मात्र वसंत देसाईनी त्यांच्याकडून दोन गाणी गाऊन घेतली होती. या गाण्याचे बोल होते 'बचपन का मोरा तेरा प्यार सुहाना देखोजी याद रखना' व 'रूठी जाए रे गुजरीया, ना बोले रे'. लताबाईंनी या चित्रपटातील 'तडप तडप के कटी उम्र आशियाने मे', 'आजा, आजा रे हाथ घबराए, रे बिन तेरे मेरा मन, अब तो आ जा' व 'देर अंधेरा हुआ, मस्त सवेरा हुवा, मै नाच री' ही तीन गाणी एकटीने गायली होती. 'मै बेजुबान हूं पंछी, मुझे छोडकर दुवा ले' व 'कान्हा ना छेडो, छेडो बांसरी रे, मै तो आ गई' ही दोन गाणी आशाबाईंनी या चित्रपटात एकटीने गायली होती. तर 'आयी परी रंग भरी किसने पुकारा' हे गाणे कोरसबरोबर. १९५८ साली *सहारात* लहान मुलांचे 'अटकन मटकन' हे गाणे गाणाऱ्या आरती मुखर्जीने या चित्रपटातदेखील 'मटक, मटक नाचू रे देखो, मै तो चीनी की हूं गुडिया' हे लहान मुलांचेच एक गाणे गायले होते. १९५७ साली मेट्रो मर्फी संगीत स्पर्धेतून चित्रपट संगीतात तिचा उदय झाला होता. *सहारा* व *दो फूल*मध्ये एकेकच गाणे तिच्या वाट्याला आले होते. या गाण्यातून चित्रपटातील तिचे संगीत जीवन सुरू झाले. *तुफान और दिया*ची लोकप्रियता काही *दो फूल*ला लाभली नव्हती. पण या चित्रपटातील वसंत देसाई यांच्या संगीताला मात्र चांगली लोकप्रियता मिळाली होती. या चित्रपटातील एकजात सारी गाणी हसरत जयपुरींनी लिहिली होती.